RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ४, अंक ४४] सोमवार, जुलै २३, २०१८/श्रावण १, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिका-यांनी तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर)**
**वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/लिगल/२०१८/१०८.— विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १२७ सह कलम १८१ च्या उप-कलम (२) खंड (zo) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणा-या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून आणि पूर्व प्रसिद्धीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे ‘ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अपील प्राधिकारी यांचे समोर अपील दाखल करण्याची कार्यपद्धती) विनियम, २००४ ’ (‘मुख्य विनियम’) या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.—** (१) या विनियमांस “ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अपील प्राधिकारी यांचे समोर अपील दाखल करण्याची कार्यपद्धती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१८” असे म्हणावे.

(२) हे विनियम ते ज्या तारखेस शासकीय **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **मुख्य विनियमांच्या अनुसूचीमध्ये सुधारणा.—** मुख्य विनियमांच्या अनुसूची मधील अनु. क्र. ९, १० आणि ११, म्हणजेच, अपिलाचा नमुना [विनियम ३(२)] खालीलप्रमाणे आहे :—

*“ ९. निर्धारित देयकाच्या संदर्भात अपीलात जात असल्याचे परवानेधारक विद्युत कंपनीला कळविल्यानंतर १/३ रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाने केलेली मागणीची तारीख.*

*१०. परवानेधारक विद्युत कंपनीने १/३ रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाकडे केलेल्या मागणीची तारीख.*

*११. परवानेधारक विद्युत कंपनीने १/३ रकमेच्या प्रदानासाठी केलेली मागणी ग्राहकास मिळाल्याची तारीख.”*

यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येईल :—

*“९. निर्धारित देयकाच्या संदर्भात अपीलात जात असल्याचे परवानेधारक विद्युत कंपनीला लेखी स्वरूपात कळविल्यानंतर अर्ध्या रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाने केलेली मागणीची तारीख.*

*१०. परवानेधारक विद्युत कंपनीने अर्ध्या रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाकडे केलेल्या मागणीची तारीख.*

*११. परवानेधारक विद्युत कंपनीने अर्ध्या रकमेच्या प्रदानासाठी केलेली मागणी ग्राहकास मिळाल्याची तारीख."*

२.२ मुख्य विनियमांच्या अनुसूचीमधील अनु. क्र. ४ म्हणजेच, " विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १२७ खाली अपील" खालीलप्रमाणे आहे :—

*" ४. विद्युत अधिनियम, २००३, कलम १२७ (२) अनुसार अपीलदाराने परवानेधारक विद्युत कंपनीला निर्धारित रकमेच्या एक-तृतियांश रक्कम रु. ____________ रोखीने/ क्र. ____________ तारीख ____________ च्या डिमांड ड्राफ्टने प्रदान केली आहे.*

*अपीलाबरोबर या रकमेच्या प्रदानाचा कागदोपत्री पुरावा जोडण्यात आला आहे."*

यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येईल :—

*" ४. विद्युत अधिनियम, २००३, कलम १२७ (२) अनुसार अपीलदाराने परवानेधारक विद्युत कंपनीला निर्धारित रकमेच्या अर्धी रक्कम रु. ____________ रोखीने/क्र. ____________ तारीख ____________ च्या डिमांड ड्राफ्टने प्रदान केली आहे.*

*अपीलाबरोबर या रकमेच्या प्रदानाचा कागदोपत्री पुरावा जोडण्यात आला आहे."*

**अभिजीत देशपांडे,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक २० जुलै २०१८.

---

**सूचना.——** " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अपील प्राधिकारी यांचे समोर अपील दाखल करण्याची कार्यपद्धती) विनियम, २००४", शासकीय **राजपत्रात** दिनांक १० जून २००४ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.

## MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION, MUMBAI

*NOTIFICATION*

THE ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Legal/2018/108.— In exercise of the powers conferred under Section 127 read with clause (zo) of sub-section (*2*) of Section 181 of the Electricity Act, 2003, and all other powers enabling it in this behalf, and after previous publication, the Maharashtra Electricity Regulatory Commission hereby makes the Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Procedure for filing appeal before the Appellate Authority) Regulations, 2004 ('the principal Regulations'), namely :—

1. *Short title, Extent and Commencement.*—(*1*) These Regulations shall be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Procedure for filing appeal before the Appellate Authority) (First Amendment) Regulations, 2018.

(*2*) These Regulations shall come into force on the date of their publication in the *Official Gazette.*

2. *Amendment to the Schedule of the principal Regulations.*—2.1 Sr. No.9, 10 and 11 in the Schedule of the principal Regulations i.e. " Form of Appeal [Regulation 3(2)] " reads as follows :—

*" 9. Date of the requisition made by the Consumer for payment of 1/3 amount after intimating in writing to the Licensee for preferring an Appeal for Assessed Bill.*

*10. Date of requisition given to the Consumer by the Licensee for payment of 1/3 amount.*

*11. Date of receipt of requisition by the Consumer issued by Licensee for payment of said 1/3 amount ."*

This shall be substituted by the following :—

*" 9. Date of the requisition made by the Consumer for payment of half amount after intimating in writing to the Licensee for preferring an Appeal for Assessed Bill.*

*10. Date of requisition given to the Consumer by the Licensee for payment of half amount.*

*11. Date of receipt of requisition by the Consumer issued by Licensee for payment of said half amount."*

2.2 Sr. No. IV in the Schedule of the principal Regulations i.e. "Appeal under Section 127 of the Electricity Act, 2003" reads as follows :—

*" IV. The appellant has paid an amount equal to one third of the assessed amount being Rs.__________ by way of cash/demand draft bearing No._____________ dated_____________ to the licensee as per Section 127(2) of the Electricity Act, 2003. The documentary evidence of such deposit has been enclosed along with the appeal. "*

This shall be substituted by the following :—

*"IV. The appellant has paid an amount equal to half of the assessed amount being Rs.__________ by way of cash/demand draft bearing No._____________ dated_____________ to the licensee as per Section 127(2) of the Electricity Act, 2003. The documentary evidence of such deposit has been enclosed along with the appeal. "*

ABHIJIT DESHPANDE,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Mumbai,
dated 20th July 2018.

*Note.*—The Maharashtra Electricity Regulatory Commission (Procedure for filing appeal before the Appellate Authority) Regulations, 2004 were notified in the *Official Gazette* on 10th June 2004.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.